
# फुले-शाहू आंबेडकर

## विचारांची प्रासंगिकता




संपादक -

• डॉ. मनिष सोनवणे

उपसंपादक -

• डॉ. सी.डी. राजपूत
• प्रा. उद्धव कुडासे
• प्रा. अजय अहिर
• प्रा. अशोक वाघचौरे

अथर्व पब्लिकेशन्स

# फुले–शाहू–आंबेडकर विचारांची प्रासंगिकता

© सुरक्षित

ISBN : 978-93-91712-88-4
पुस्तक प्रकाशन क्र. ९१९

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई–मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १९ फेब्रुवारी २०२२
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ७००

---

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

---

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

---

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

---

१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रातून
प्रेरित झालेले शिक्षणविषयक दृष्टिकोन ..............................२१
– अविनाश कैलास पवार

२ दलित ऐक्य का होत नाही? ..............................२९
– डॉ. प्रकाश मारुती पवार

३ महात्मा फुले : महाराष्ट्रातील पुरोगामी समाजसुधारक ............३४
– डॉ. सी. डी. राजपूत

४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल
खेडोपाडी पोहोचविणारा लोकशाहीर–अण्णा भाऊ साठे ..........३८
– डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर

५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ................४३
– प्रा. अजय एकनाथ अहीर

६ सावित्रीबाई : एक समाज प्रबोधनकार ..............................५०
– डॉ. मीनाक्षी पाटील

७ राजर्षी शाहू महाराज : एक 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष'..................५५
– प्रा. अशोक भावराव वाघचौरे

८ राजर्षी शाहू महाराज : एक आदर्श राज्यकर्ता ......................६१
– डॉ. स्नेहल संजय मराठे

९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक तत्त्वज्ञान.................६६
– प्रा. उदय खंडू टेके

१० डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्य समाजवादी
विचारांची प्रासंगिकता ..............................................७४
– प्रा. प्रदीप उत्तम वेताळ

# राजर्षी शाहू महाराज : एक आदर्श राज्यकर्ता

– *डॉ. स्नेहल संजय मराठे*
साहाय्यक प्राध्यापक,
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, मालेगाव. जि. नाशिक

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी झटणारे राजर्षी शाहू छत्रपती हे एक महान व्यक्तिमत्त्व होते. भारताच्या राजकीय व सामाजिक इतिहासाला ज्या थोर पुरुषांनी आपल्या कर्तृत्वाने नवी दिशा दिली, त्या महान नेत्यांमध्ये शाहू महाराजांचे नाव फार महत्त्वाचे आहे. शाहूराजे हे विवेकी व धोरणी होते. लहान असो वा थोर अथवा सरदार असो वा गरीब प्रत्येकाशी शाहू महाराज खेळीमेळीने वागून प्रत्येकाला ते आपलेसे करून घेत. आपल्या २८ वर्षांच्या देदीप्यमान राज्यकारभारात या युगप्रवर्तक महापुरुषाने समाजाचे सर्वांगीण कल्याण साधावे यासाठी अविरत प्रयत्न केले.

उल्लेखनीय अशी स्मरणशक्ती आणि वाखाणण्याजोगे व्यवहारज्ञान हे शाहू महाराजांना मिळालेले वरदान होते. त्यांनी शैक्षणिक प्रगतीचा अपेक्षित टप्पा गाठला होता. त्यांनी राज्यकारभाराशी निगडित असलेल्या विषयांमध्ये चांगलीच प्रगती केली होती. अर्थशास्त्र, कायदा, प्राथमिक विज्ञान आणि इतिहास या विषयांच्या मुळाशी जाऊन कसून अभ्यास केला होता. त्यांना मैदानी खेळ आवडत असत. कुस्ती हा त्यांचा आवडता खेळ. ते लष्करी संचलन, नेमबाजी, घोड्यावरची रपेट यात अत्यंत प्रवीण होते. रविवारी ते घोडदौड करण्यात व शिकार करण्यात दंग असत आणि सोबत अभ्यासदेखील मनापासून करत.

'शाहू महाराज हा किती मोठा राजा होता, त्यापेक्षा किती मोठा माणूस होता हे पाहणे मनाला आनंद देणारे आहे' असे शाहू महाराजांचे वर्णन श्री. पु. ल. देशपांडे यांनी केले आहे. समाजातील तळातल्या माणसाला न्याय देण्याचा विचार माणुसकीचा गहीवर असल्याशिवाय जन्म घेत नाही आणि म्हणून समाजप्रबोधनाचे क्रांतिकारक कार्य करण्यात ते अग्रदूत ठरले. महाराजांच्या मनात असलेली सामाजिक सुधारणा ही सर्वव्यापी स्वरूपाची होती. महाराष्ट्रात महात्मा जोतिराव फुले यांच्यानंतर अस्पृश्यता निवारण यासंबंधी पोटतिडकीने विचार मांडणारे, योजनापूर्वक अस्पृश्यता निवारण्यासाठी शासकीय, अशासकीय

सर्व क्षेत्रांत तडाखेबंद प्रयत्न करणारे छत्रपती शाहू महाराज होय.

२६ जुलै १९०२ रोजी महाराजांनी संस्थानातील नोकऱ्यांमध्ये मागासलेल्या जातीजमातींसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी केली. अस्पृश्य लोकांना आपल्या खासगीत नेमून घेतले. मोटारीचे ड्रायव्हर, क्लीनर, पोलीस कोचमन, माहूत, टपालवाला, घोडेस्वार अशा विविध प्रकारच्या नोकऱ्या दिल्या. तसेच शाळा, दवाखाने, सरकारी कचेऱ्या, पाणवठे इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला. दलित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल त्यांना जिव्हाळा होता. म्हणून ते दलित समाजातील कार्यकर्त्यांना त्यांचा सल्ला ऐका असे सुचवीत असत. असा निःस्वार्थ व निःस्पृह सल्ला देणारा हा राज्यकर्ता आगळा माणूस. महार कुटुंबाला पिढ्यान्‌पिढ्या वरिष्ठ जातीच्या गुलामगिरीत अडकविलेल्या 'महार वतना'ची क्रूर पद्धत १८ सप्टेंबर १९१८ रोजी कायद्याने नामशेष केली. महारवाड्यात जाणारा पहिला राजा म्हणून सामाजिक चळवळीच्या इतिहासात या राजाची नोंद सुवर्णाक्षरांनी करावी लागेल. १९०१ ते १९२२ या २२ वर्षांच्या काळात वेगवेगळ्या जातींची २३ वसतिगृहे निर्माण केली. त्यामुळे त्या त्या जातींच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली. माणगाव येथे भरलेल्या दलितांच्या परिषदेस उपस्थित राहून दलितांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाचा गौरव केला.

शाहू महाराजांचे कर्तृत्व बिनतोड होते. त्याला त्यांनी आपल्या कल्पनेची, बुद्धिमत्तेची व अचाट स्मरणशक्तीची जोड दिली होती. त्यामुळे त्यांचे प्रत्येक कार्य प्रकाश देत राहिले. स्वतःच्या वाट्याला दुःखाचे काटे आले, तरी समाजाला सुखद फुले देण्यातच ते आपले हित मानत असत. हे हित करताना त्यांच्यावर टीकेची झोड उठविण्यात आली, तरी त्याची त्यांनी पर्वा केली नाही. त्यांची स्मरणशक्ती दांडगी होती. माणूस म्हटला की, त्याच्याकडून चुका होणारच. परंतु या चुकांची पुनरावृत्ती मात्र त्याच्याकडून होता कामा नये. हा प्रगल्भ विचार त्यांच्याकडे होता. आपल्या राज्यातील एखाद्या कर्मचाऱ्याकडून एखादी चूक झाली व त्या चुकीत सुधारणा होत नाही हे जाणवताच त्याला महाराज धडा देत. उपद्रवी लोकांचा काटा काढण्यासाठी सूडबुद्धीची भावना न ठेवता, त्यांची सुधारणा हाच दृष्टिकोन ठेवून धडा देत असत. लहान असो वा थोर, श्रीमंत असो वा गरीब प्रत्येकाशी शाहू महाराज खेळीमेळीने वागून प्रत्येकाला ते आपलेसे करून घेत. एखादी समस्या निर्माण झाली तर ते आपल्या तल्लख बुद्धीने एक तर त्याची सोडवणूक करीत अथवा तसाच प्रसंग असला तर त्याला वेगळ्या ढंगाने, पण चातुर्याने उत्तर देत.

महाराजांची नेहमीच प्रगल्भ इच्छा असावयाची की, आपली जनता प्रकृतीने दणकट असावी. तिच्यात वीरवृत्ती वाढावी. यासाठी महाराजांनी कुस्तीला मदत व प्रोत्साहन दिले. जंगली क्रूर श्वापदे केवळ पाळली नाहीत, तर त्यांच्यावर आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे त्यांनी प्रेम केले. त्यांचे स्पष्ट म्हणणे होते, मनुष्याच्या नीतिशास्त्रात सर्व चराचर सृष्टीचा विचार केलेला असला पाहिजे. मानव व मानवेतर सृष्टीशी जिव्हाळ्याचे संबंध जोडील, तरच तो सर्व सृष्टीत श्रेष्ठ ठरेल. म्हणूनच महाराजांनी पशू, पक्षी, वृक्ष, वनस्पती यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध जोडले. त्यांनी पाळलेल्या वाघाचा उपयोग ते ठग प्रवृत्तीच्या लोकांवर दहशत निर्माण करण्यासाठी करीत. अहंकाराविषयी त्यांना प्रचंड राग होता. खुषमस्कऱ्यांची त्यांच्याभोवती नेहमीच गर्दी व्हायची. अशा लोकांना ते पद्धतशीर बाजूला करीत. कारण, अशा लोकांची शाहू महाराजांना मनस्वी चीड होती.

सामाजिक चळवळी करणाऱ्या थोर पुरुषांच्या बाबतीत म्हटले जाते की, ते काळाच्या पुढे असतात. महाराजांनी जवळपास ऐंशी वर्षांपूर्वी जे कार्य केले ते तत्कालीन समाजातील उच्चवर्णीय लोकांच्या टीकेचा व निंदेचा विषय होऊन बसले होते. पण इतक्या वर्षांनंतर महाराजांच्या कार्याला आता राजमान्यता व लोकमान्यता मिळालेली आहे. त्यांनी राष्ट्र उभारणीचे कार्य केले होते. त्यांनी आपल्या प्रत्येक कार्याची दिशा ही 'सकळ बहुजन समाजाला शहाणे करून सोडावे' या प्रगल्भ उद्देशानेच आखली होती. शिक्षणाबरोबरच या समाजाने व्यवसायातदेखील आपला नावलौकिक वाढवावा, ही महाराजांची तीव्र इच्छा होती. आपल्या संस्थानातील नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के जागा मागासलेल्या सर्व जातींना राखून ठेवल्या. दुसरीकडे जातीच्या निकषावर नोकरीत प्रवेश झाल्यावर त्या व्यक्तीची पुढील प्रगती-बढती ही तिच्या गुणवत्तेवर राहील, असाही कायदा त्यांनी अमलात आणला.

लोकमान्य टिळकांसारखे राजकीय कार्यकर्ते, आगरकर व रानडे यांच्यासारखे समाजसुधारक आणि 'सत्यशोधक समाजा'चे संस्थापक महात्मा फुले हे शाहू महाराजांचे समकालीन. बहुजन समाज शिक्षण, धर्म, अर्थ, नीती, साहित्य, कृषी, उद्योग, राजकारण, विज्ञान इत्यादी सर्व बाजूंनी सामर्थ्यशाली होण्यासाठी सत्यशोधक चळवळ कार्य करीत होती. बहुजनांच्या मुक्तीसाठी हा लढा होता. या चळवळीला शाहू छत्रपतींनी अनेक मार्गांनी पाठिंबा दिला. वेदोक्त प्रकरणाने केवळ शाहू छत्रपतींच्या जीवनातच नव्हे; तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आमूलाग्र क्रांती घडवून आणली. महाराज जातीय विषमता नष्ट करण्याच्या प्रयत्नाला लागले. जातीय समानता प्रस्थापित करणे म्हणजेच जातिसंस्थेच्या अस्तित्वाला सुरुंग लावणे हे त्यांच्या मनात पक्के रुजले होते. म्हणूनच त्यांनी

प्रथम बहुजनांच्या शिक्षणाला हात घातला.

शाहू महाराज हे निष्ठावंत बलोपासक होते. आपल्यासारखी सामर्थ्यवान आणि धिप्पाड माणसे महाराजांना आवडायची. बलोपासकांचे ते संग्राहक होते. आपल्या लोकांना कुस्तीचा छंद लागावा म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. होतकरू पठ्ठ्यांना उदार आश्रय दिला. पारितोषिके देऊन प्रोत्साहन दिले. त्यांचा मानसन्मान केला. करवीरच्याच नव्हे; तर दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकाच्या जनतेत त्यांनी मल्लविद्या रुजविली. ज्याप्रमाणे शिवरायांनी गावांना आखाडे-तालमी स्थापन करून शक्तीच्या उपासनेस सक्रिय प्रोत्साहन दिले, ही शक्ती राष्ट्र उद्धारण्यासाठी लावली, अगदी त्याचप्रमाणे शाहूरायांनी गावोगावी आखाडे - तालमी स्थापन करून त्यांना सढळ हाताने मदत केली. मल्लविद्येबरोबरच शस्त्रविद्येत गावोगावचे तरुण पारंगत होऊ लागले. मुन्ना, देवाप्पा धनगर, शिवाप्पा बेरड, पांडू भोसले, कृष्णा मर्दाने असे अनेक पैलवान शाहूरायांचे पठ्ठे होते. शाहू महाराजांनी कोल्हापूरला मल्लविद्येचे विद्यापीठ बनविले. या करवीर मल्लविद्यापीठाकडे अवघ्या भारतातून मल्लांचा लोंढा येऊ लागला. महाराजांनी त्यांना आपलेपणाने आश्रय दिला, बिदागी दिली. ज्या वेळी दरबार भरत असे, त्या वेळी गव्हर्नर, व्हाईसराय व इतर उच्च अधिकारी यांच्यासमोर मर्दानी खेळांची लढत व खेळांचे प्रात्यक्षिक होई. कुस्त्यांच्या मैदानात अगोदर मर्दानी खेळ होत आणि नंतर कुस्त्यास प्रारंभ होत असे. दांडपट्टा, फरिगदगा, लाठीबोथाटी, जंबिया, विटा इत्यादी शस्त्रास्त्रांचे खेळ गव्हर्नर व प्रेक्षकांसमोर सादर केले जात. मराठ्यांच्या पराक्रमाची चुणूक एत्तदेशीयांना तसेच परदेशी यांना दाखवून त्यांना दीपवण्याची कामगिरी शाहूरायांनी मर्दानी खेळांना प्रोत्साहन व पुरस्कार देऊन केली.

शाहू छत्रपती यांना राज्यकारभारामध्ये सुव्यवस्था निर्माण करून संस्थानाच्या आर्थिक व्यवस्थेत सुधारणा घडवून आणावयाची होती. शिक्षणाचा प्रसार करावयाचा होता. सार्वजनिक आरोग्याची सोय व रस्ते बांधणी करावयाची होती. कारभारातील भ्रष्टाचार आणि लाचलुचपत हे दोष समूळ नष्ट करावयाचे होते. जनतेची उत्क्रांती, भरभराट आणि प्रगती यांच्या मार्गात तिच्या अनिष्ट सामाजिक चालिरीती व अंधश्रद्धा यांचा अडसर होता, याची त्यांना जाणीव होती. शासन भक्कम पायावर उभे करावयाचे होते. हा हेतू साध्य करण्यासाठी फक्त एकाच जातीच्या राज्यकारभाराची सूत्रे ठेवणे योग्य नव्हते. इतर जातींनासुद्धा त्यात भाग घेता यावा, असे धोरण ठेवून छत्रपतींनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली होती. शाहू महाराजांनी आपल्या प्रजाजनांना दुष्काळाच्या तावडीतून सुखरूपपणे बाहेर काढण्यासाठी अविरत प्रयत्न केले. प्लेगच्या दिवसांत स्वस्त धान्याची दुकाने उघडली, अनाथालये उघडली, बेकारीला आळा घालण्यासाठी सार्वजनिक

कामे सुरू केली, पटकीच्या दिवसात खेड्यापाड्यांत स्वच्छता राखली. फुकट औषधोपचार केले. यात्रा स्थगित केल्या होत्या. दुर्बल आणि गरीब जनतेला अन्न मोफत पुरविण्यात आले. अगदी अशीच परिस्थिती आज आपण कोरोनाकाळात अनुभवली आहे. या काळात अनेक स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था यांनी पुढाकार घेऊन अशा पद्धतीची कामे केलेली पाहिली आहेत. एक आदर्श राज्यकर्ता कसा असावा हे शाहू महाराजांचे एक उत्तम उदाहरण आपल्यासमोर आहे.

अशाप्रकारे शाहू छत्रपती हे एक यशस्वी व लोकप्रिय राज्यकर्ते म्हणून उदयास आले. त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व, त्यांचे ठायी वसत असलेली कृतज्ञतेची भावना, खाजगी जीवनातील त्यांची साधी राहणी, त्यांना लाभत असलेले कौटुंबिक सौख्य यामुळेच केवळ नव्हे; तर आपल्या प्रजेच्या बाबतीतील त्यांची तळमळ, शासनावरील पूर्ण नियंत्रण, यामुळेही त्यांना प्रजेकडून प्रेम मिळाले. एक आदर्श राजा म्हणून त्यांची कीर्ती झाली. त्यांची विविध क्षेत्रातील कार्ये पाहिली म्हणजे हा राजा समग्र क्रांतीचा (Total Revolution) पुरस्कर्ता होता, असे हे दिसून येईल.

**संदर्भ**


१) शाहूंच्या आठवणी : प्रा. नानासाहेब साळुंखे, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.

२) राजर्षी शाहू छत्रपती : धनंजय कीर.

३) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : संपादक - प्रा. डॉ. रमेश जाधव, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई.

४) राजर्षी शाहू : काळ, विचार आणि कार्य - संपा. डॉ. एस. एस. भोसले.

५) युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड - बाबा भांड, साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद.